PCNTDA
सेवा श्रद्धासमन्विता

# माहितीपत्रक

## पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,

नवीन प्रशासकीय भवन,

आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,

आकुर्डी, पुणे-४४.

## दुरध्वनी क्रमांक - (०२०) २७६५२९३४ / ३५

## भू-विभाग

प्राधिकरणातील पेठ क्र.४ वाहनतळ क्र.१, पेठ क्र.७ वाहनतळ क्र.१ , पेठ क्र.१८ वाहनतळ क्र.१, पेठ क्र.२० वाहनतळ क्र.१, पेठ क्र.२५ वाहनतळ क्र.१, पेठ क्र.CDC वाहनतळ क्र.१ हे

वाहनतळ प्रयोजनाचे भूखंड निविदा पध्दतीने

भाडे तत्वावर (Leave & License) देण्याच्या

**निविदेच्या अटी व शर्तीबाबत माहितीपत्रक**

सन २०१७-१८

# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

नवीन प्रशासकिय इमारत, आकुडी रेल्वेस्टेशनजवळ, पुणे -४११०४४.
दुरध्वनी क्रमांक (०२०)२७१६६००० (विस्तारीत ११०४/११०९/१११३)

ई- निविदा सुचना क्रमांक भू-४४ ते ४९ सन २०१७-१८

प्राधिकरणातील वाहनतळ भूखंडांची विक्री करणेकामी, टेंडर डॉक्युमेंटमध्ये नमुद केल्याप्रमाणे विहित पात्रता धारण करणाऱ्या इच्छुक निविदाधारकांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | अंदाजे रक्कम रु. | बयाना रक्कम | निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १. | भू-४४ | पेठ क्र.४ वाहनतळ क्र.१ | ४,००,०००/- | ६,५००/- | १,३००/- |
| २. | भू-४५ | पेठ क्र.७ वाहनतळ क्र.१ | २९,५०,०००/- | ६५,०००/- | ३,९००/- |
| ३. | भू-४६ | पेठ क्र.१८ वाहनतळ क्र.१ | ४,५०,०००/- | ६,५००/- | १,३००/- |
| ४. | भू-४७ | पेठ क्र.२० वाहनतळ क्र.१ | ४,५०,०००/- | ६,५००/- | १,३००/- |
| ५. | भू-४८ | पेठ क्र.२५ वाहनतळ क्र.१ | ८,५०,०००/- | १३,०००/- | २,६००/- |
| ६. | भू-४९ | पेठ क्र.CDC वाहनतळ क्र.१ | ९,००,०००/- | १३,०००/- | २,६००/- |

प्राधिकरणातील पेठ क्र.४ वाहनतळ क्र.१, पेठ क्र.७ वाहनतळ क्र.१ , पेठ क्र.१८ वाहनतळ क्र.१, पेठ क्र.२० वाहनतळ क्र.१, पेठ क्र.२५ वाहनतळ क्र.१, पेठ क्र.CDC वाहनतळ क्र.१च्या ई- निविदा विक्री योजनेचा कार्यक्रम खालीलप्रमाणे:-

| अ.क्र | तपशील | काम सुरु दिनांक | वेळ | अंतिम दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | ऑनलाईन निविदा जाहिरात प्रसिध्दी | ०१/०३/२०१८ | - | | - |
| २. | कागदपत्र डाऊनलोड करणे | ०१/०३/२०१८ | १०.०० | २०/०३/२०१८ | १८.०० |
| ३. | निविदा पूर्व बैठक | ०६/०३/२०१८ | १५.०० | | - |
| ४. | निविदा सादर करणे | ०१/०३/२०१८ | १०.०० | २०/०३/२०१८ | १८.०० |
| ५. | निविदा उघडणे | ३१/०३/२०१८ | १५.०० | | - |
| ६. | टिप:- निविदा अर्ज शुल्क व बयाना रक्कम फक्त नेट बँकींगद्वारे ई- पेमेंट गेटवे नेच स्विकारले जाईल. SB MOPS व इतर इंटरनेट बँकीगचा वापर करणाऱ्या निविदाधारकांनी ऑनलाईन पेमेंट चार दिवस आधी करावे. | | | | |

**सुचना:-**

अ) ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व पात्र कंपनी / संस्था / व्यक्ती यांनी ई-निविदा पोर्टल **https://mahatenders.gov.in** वर नोंदणी करणे सक्तीचे असून त्यांना लागू असणाऱ्या आवश्यक त्या प्रवर्गाच्या पॅनलवर स्वत:ची नोंदणी करुन घेणे गरजेचे आहे.

ब) निविदा धारकांना ई- निविदा भरताना अधिक तपशील आवश्यक असल्यास अथवा कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण झाल्यास त्यांनी २४X७ टोल फ्री क्रमांक १८००-३०७०-२२३२तसेच भ्रमणध्वनी क्रमांक९१-७८७८००७९७२ किंवा ९१-७८७८००७९७३ वर संपर्क साधावा.

व्यक्तीशह: पाठविण्यात येणारी निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा धारकांकडून ऑन लाइन निविदा प्राप्त न झाल्यास निविदा उघडली जाणार नाही.

ड) कोणतेही कारण न देता १ अथवा सर्व निविदा नाकारण्याचा सर्वस्वी अधिकार प्राधिकरणाचा राहिल.

इ) सविस्तर अटी व शर्ती, पोर्टलवर पाहावयास उपलब्ध आहे.

फ) सदर निविदा सुचना **'www.pcntda.org.in'** या संकेत स्थळावर पाहण्यास उपलब्ध आहे.

12/2/15

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

पि. चि. न. वि. प्रा. आकुर्डी

# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे ४४.

## दुचाकी/ चारचाकी/ जड वाहनांकरीता वाहनतळ भूखंड भाडेतत्वावर देणेबाबत निविदा अटी व शर्तीचे माहितीपत्रक

### प्रस्तावना

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातील पेठ क्र.४ वाहनतळ क्र.१, पेठ क्र.७ वाहनतळ क्र.१ , पेठ क्र.१८ वाहनतळ क्र.१, पेठ क्र.२०.वाहनतळ क्र.१, पेठ क्र.२५ वाहनतळ क्र.१, पेठ क्र.CDC वाहनतळ क्र.१ ही वाहनतळ प्रयोजनासाठीच्या राखीव जागेचे, पात्र कंपनी / व्यक्ती अथवा संस्था यांना ई-निविदा निविदा पध्दतीने प्रथम **१** वर्षासाठी व नंतर **२** वर्षासाठी अशा एकूण **३** वर्षासाठी भाडेतत्त्वावर **(Leave & License)** करारनाम्याने देण्याचे प्रस्तावित आहे.

या योजनेतील भूखंडाचे स्थान व प्रत्यक्ष भूखंडाची चतु :सिमा सोबतच्या समजुतीच्या नकाशात दर्शविली आहे.

**निविदा अर्जदाराची पात्रता :**

१. निविदा भरु इच्छिणारी व्यक्ती कायदयाने सज्ञान असावी.

२. निविदा भरण्याच्या दिनांकापासून आधीची सलग १० वर्षे तिचा महाराष्ट्रात अधिवास असावा, यासाठी निविदेसोबत अधिवास दाखला जोडावा.

३. निविदा भरणारी संस्था अथवा कंपनी असल्यास त्याची महाराष्ट्रात नोंदणी असावी.

४. भागिदारी संस्थेने अर्ज केला असेल तर -

(अ) निविदेवर सर्व भागिदारांनी सहया करणे आवश्यक आहे, तसेच या सर्व भागिदारांची नावे दर्शविणारे रजिस्ट्रार ऑफ फर्म्सचे प्रमाणपत्र तसेच भागिदारी दस्त त्या सोबत जोडावे.

(ब) निविदा लिमिटेड कंपनीने भरली असेल तर त्यावर व्यवस्थापकीय संचालकाची अगर सचिवाची अगर प्राधिकृत अधिकाऱ्यांची सही असावी. तसेच कंपनी नोंदणी प्रमाणपत्र व प्राधिकृत केल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे . संचालक मंडळाच्या ठरावाची प्रत जोडावी किंवा कंपनीतर्फे मुखत्यारपत्र धारण करणाऱ्याची सही असल्यास मुखत्यारपत्राची खरी नक्कल जोडावी.

(क) सहकारी संस्थेने निविदा भरली असेल तर संस्थेच्या अध्यक्षाची अगर सचिवाची सही पाहिजे. तसेच संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र व कार्यकारी मंडळाच्या ठरावाची प्रत जोडावी.

**<u>जागेचा वापर :</u>**

१. प्रस्तुत भूखंडाचा वापर हा केवळ वाहनतळ म्हणूनच करता येईल . अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी भूखंडाचा वापर केल्यास तो करारनाम्याचा भंग झाल्याचे समजण्यात येईल व करारनामा तात्काळ रद्द करुन जागेचा ताबा प्राधिकरणाकडे परत घेण्यात येईल.

२. ज्याचे किंवा ज्यांचे नांवाने निविदा भरली असेल आणि त्याची किंवा त्यांची निविदा जर मान्य झाली तर त्याच नावाने वाहनतळ सुरू करता येईल.

३. निविदा भरणाऱ्यास आपली निविदा दुसऱ्याचे नावाने बदलता अगर वर्ग करता येणार नाही.

**<u>अर्ज सादर करण्याची पद्धत :</u>**

१) जाहिरातीप्रमाणे ई-निविदा भरताना त्यामध्ये प्राधिकरणाला **<u>वार्षिक</u>** जास्तीत जास्त किती भाडे देणार आहेत याचा स्पष्ट उल्लेख निविदेत (अंकी तसेच अक्षरी) करावा. त्यात स्पष्टता नसेल तर ती निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

२) प्राधिकरणाच्या पायाभुत दरानुसार परिशिष्ट - अ मध्ये दर्शविलेल्या बयाणा रकमे एवढी रक्कम

**e-payment gate-way mode द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे जमा करावी.**

**<u>निविदा सादर करणे</u> :**

१) प्रस्तुत विक्री योजनेची जाहिरात व माहिती पत्रक पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या वेबसाईटवर (www.pcntda.org.in) नागरिकांच्या सोयीसाठी उपलब्ध करुन दिला आहे.

२) जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या मुदतीत व वेळेमध्ये पिंपरी -चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयाच्या संकेतस्थळावर (**www.pcntda.org.in**) पाहता येईल.

**३) फॉर्म फी व बयाना रक्कम e-payment gate-way mode द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे जमा करावी.**

४) वाहनतळ भूखंड भाडेतत्वावर देणेकामी ई- निविदा पध्दतीने निविदा मागविणेत येत आहेत.

५) ई- निविदा (१) **तांत्रिक लिफाफा** व (२) **वाणिज्य लिफाफा** या पध्दतीने Upload करावी.

<u>निविदेसोबत लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे :</u>

**<u>लिफाफा क्र. १ मधील (तांत्रिक लिफाफा) कागदपत्रे :</u>**

**<u>(परि -२ मधील नमुन्यातील अर्ज भरुन Scan करुन upload करावा.)</u>**

**पात्रतेबाबतची कागदपत्रे.**

अ) सज्ञान असल्याबाबत वयाचा पुरावा.

ब) अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल सर्टीफिकेट)

क) संस्था अथवा कंपनी असल्यास महाराष्ट्रातील नोंदणी प्रमाणपत्र.

ड) अर्जदार संस्था किंवा कंपनी असल्यास प्रस्ताव सादर करणेबाबत संस्थेचा ठराव व अर्ज सादर करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या नावे अधिकारपत्र.

इ) रजिस्ट्रार ऑफ फर्म्सचे प्रमाणपत्र तसेच भागिदारी दस्त (आवश्यकतेप्रमाणे)

फ) प्राधिकरणाच्या पायाभुत दरानुसार परिशिष्ट -अ मध्ये दर्शविलेल्या बयाणा रकमेएवढी रक्कम e-payment gate-way mode **द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे जमा करावी.**

**(उपरोक्त नमुद कागदपत्रे Scan करुन upload करावीत.)**

**लिफाफा क्र. २ मधील (वाणिज्य लिफाफा) कागदपत्रे :**

विहीत नमुन्यातील निविदा अर्ज, मागणी केलेल्या भूखंडासाठी जास्तीतजास्त देवू केलेल्या दराच्या (Offer Price) उल्लेखासह प्राधिकृत व्यक्तीचा फोटो लावून स्वाक्षरी करुन सादर करावा. परिशिष्ट - ३ नुसार **विहित नमुन्यातील अर्ज Scan करुन upload करावा.**

**निविदा उघडणे:-**

१) तीन निविदा प्राप्त झाल्यास ई- निविदा दि. / /२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता उपस्थित निविदाधारकांसमोर उघडण्यात येतील.

२) निविदा भरण्यापूर्वी संबंधितांनी, वाटपासाठी प्रस्तावित केलेली जागा, परिसर, क्षेत्रफळ इ. ची पाहणी स्वत: करावी. तसेच वाहनतळ वापराबाबतचे अधिकार व कर्तव्ये याबाबतची माहिती करुन घ्यावी. या संदर्भात निविदा मंजुर केल्यानंतर कोणतीही तक्रार करता येणार नाही.

३) निविदा उघडताना प्रथम लिफाफा क्र . १ उघडण्यात येईल. यामध्ये पात्रतेप्रमाणे निविदाधारकाची कागदपत्रे योग्य असतील व आवश्यक बयाना रक्कम भरणा केली असेल तसेच निविदा निकषांप्रमाणे पात्र ठरत असेल तरच लिफाफा क्र. २ मध्ये ठेवलेली निविदा उघडणेत येईल. **लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रे अपुर्ण असतील तर लिफाफा क्र.२ उघडण्यात येणार नाही.**

४) निविदा उघडल्यानंतर ती कोणत्याही परिस्थितीत मागे घेता येणार नाही.

५) कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार प्राधिकरणाचा राहील.

६) यशस्वी निविदाधारकाला भाडेकरार करण्यापूर्वी सुरक्षा अनामत रक्कम म्हणून एक वर्षासाठी निश्चित केलेल्या भाडयाच्या पूर्ण रक्कमेएवढी रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेच्या बँक गॅरेंटीच्या स्वरुपात प्राधिकरणाकडे जमा करावी लागेल.

७) यशस्वी निविदाधारकांस त्याने देवू केलेली पूर्ण रक्कम व त्यावरील प्रचलित दराने येणारी जीएसटी कराची रक्कम भाडेकरारनामा करणेपूर्वी जमा करावी लागेल.

८) एका निविदाधारकाने एकच निविदा भरणे बंधनकारक आहे. ( 1 Bid per Bidder)

९) यशस्वी निविदाधारकांबरोबर प्राधिकरण प्रथम १ वर्षे कालावधीसाठी भाडेकरार (Leave & License) करुन देईल. त्यानंतर पुढील दोन वर्षांसाठी भाडेकराराचे (Leave & License) नुतनीकरण करण्यात येईल. अशा प्रकारे भाडेकराराचा (Leave & License) एकुण ३ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर निविदाधारकाने खुल्या जागेचा ताबा प्राधिकरणास परत देणे आवश्यक आहे. असा ताबा घेतल्यानंतर जागा सुयोग्य परिस्थितीत आहे अथवा नाही, विविध स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर, वीजबिल, उपकर, देणी ही पूर्णपणे दिली आहेत अथवा नाही याची खातरजमा करुन निविदाधारकाने प्राधिकरणाकडे भरलेली अनामत रक्कम विनाव्याज, वरील थकबाकी असल्यास वजावट करुन त्यास परत करण्यात येईल. तसेच भाडेकरारातील (Leave & License) कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास संपूर्ण अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१०) मंजूर न झालेल्या निविदाधारकांना त्यांनी निविदेसोबत सादर केलेली बयाणा रक्कम विहित मुदतीत परत करण्यात येईल. या रकमेवर कोणतेही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

**<u>भाडेकराराची (Leave & License) रक्कम भरणे, करारनामा करणे :</u>**

१) सर्वात जास्त रक्कमेची निविदा स्विकृती केल्यानंतर निविदेतील दरानुसार १ वर्षाच्या भाडयाची पुर्ण रक्कम निविदा स्विकृतीच्या दिंनाकापासून १५ दिवसांच्या आत भरावी लागेल. या मुदतीमध्ये रक्कम न भरल्यास कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही. रक्कम मुदतीत न भरल्यास स्विकृतीपत्र रद्द करुन पूर्ण अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२) भाडेरक्कम भरणा पुर्ण झाल्यानंतर १५ दिवसांचे कालावधीत भाडेकरार (Leave & License) करावा लागेल.

३) भाडेकरार करण्यासाठी आवश्यक ती स्टॅम्पड्युटी, रजिस्ट्रेशन शुल्क इत्यादी अनुषंगिक खर्च निविदाधारकास करावा लागेल.

४) प्राप्त झालेल्या निविदा अंतिम निर्णयासाठी प्राधिकरण सभेपुढे ठेवण्यात येतील व याबाबतचा निर्णय निविदाधारकांना **<u>अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने</u>** कळविणेत येईल. परंतु कोणतीही निविदा स्विकारणे अगर नाकारणे व सर्व निविदा कोणतीही कारणे न देता नाकारणे याचा सर्वस्वी अधिकार प्राधिकरणाचा राहील. याबाबतचा प्राधिकरणाचा निर्णय अंतिम राहील व तो सर्वांवर बंधनकारक राहील. तसेच याबाबतची कारणे देणे अगर दाखविणे हे प्राधिकरणावर बंधनकारक नाही.

५) निविदाधारकाला कोणत्याही टप्प्यावर निविदा मागे घेता येणार नाही. स्विकृत झालेली निविदा मागे घेतली तर अनामत रकमेपोटी भरलेली सर्व रक्कम जप्त करण्यात येईल.

६) वरीलपैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास करारनामा रद्द करुन जागेचा ताबा परत घेण्यात येईल व अनामत रकमेपोटी भरलेली सर्व रक्कम जप्त करण्यात येईल.

७) वर नमूद केलेल्या अटी व नियमांमध्ये कोणत्याही वेळी प्राधिकरणास योग्य वाटेल तो फेरबदल करणे, रद्द करणे, त्यात दुरुस्ती करणे किंवा नवीन अटी किंवा नियम यांचा समावेश करणे याचे पूर्ण अधिकार **मुख्य कार्यकारी अधिकारी** यांना असतील. हा अधिकार **मुख्य कार्यकारी अधिकारी** योग्य वाटेल त्यावेळी वापरु शकतात. अशा रितीने बदलण्यात आलेले, रद्द केलेले, दुरूस्त केलेले, तसेच नवीन केलेले नियम किंवा अटी निविदाधारकांवर वेळोवेळी बंधनकारक राहतील.

८) पात्र निविदाधारकांनी आयकर कलम १९४ i(A) नुसार आयकर कपातीबाबत त्यांच्या स्तरावर कार्यवाही करावयाची आहे.

९) प्राधिकरणाकडे जमा रकमेवर कोणत्याही कालावधी करिता व्याज मिळणार नाही.

१०) सदर भूखंडावर लागू होणारे सर्व प्रकारचे कर / उपकर हे निविदाधारकांनी भरावयाचे आहेत. तसेच वाहनतळाचा वापर हा व्यापारी स्वरुपाचा असल्याने प्रचलित जीएसटी लागू होतो. त्यामुळे निविदाधारकांनी प्राधिकरणास वार्षिक भाडे + प्रचलित दराने जीएसटी अदा करावयाचा आहे.

**<u>भूखंड वापराच्या अटी व शर्ती</u> :**

१. निविदाधारकाने सायकल, स्कूटर, मोटरसायकल अन्य दुचाकी वाहने, तीनचाकी व चारचाकी व जड वाहने ठेवण्यासाठी जागा उपयोगात आणली पाहिजे.

२. वाहनतळामध्ये ठेवण्यात येणाऱ्या वाहनांसाठी प्राधिकरणामार्फत खालीलप्रमाणे शुल्क निश्चित करुन देणेत येत असून यशस्वी निविदाधारकाला त्याप्रमाणेच शुल्क आकारणी करावी लागेल. सदरचे दर ***सन २०१७-२०२० या ३ वर्षासाठी लागू राहतील.***

**पार्किंगचे दर :-**

१. **दुचाकी वाहने :- प्रति तासाकरीता र. रु. २/- व मासिक पास रु. १५०/-**
२. **चारचाकी वाहने :- प्रति तासाकरीता र. रु. ५/- व मासिक पास रु. ४५०/-**
३. **जड वाहने प्रती तास रु. १०/- व मासिक पास रु. ३५००/-**

३. वाहनतळावरील वाहनांच्या संरक्षणाची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची असून वाहनांची चोरी, मोडतोड, नुकसान इ. झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची असणार नाही.

४. वाहनतळाचा वापर सलगपणे २४ तास करावा लागेल. वाहनतळाचा वापर करणाऱ्या नागरिकांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होणार नाही याची दक्षता यशस्वी निविदाधारकाने घ्यावयाची आहे.

५. निविदेमध्ये नमूद केलेला वापर उपयोगात आणण्यासाठी आवश्यक त्या सर्व सरकारी खात्यांची पूर्वपरवानगी घेणे ही जबाबदारी निविदाधारकाची राहील.

६. वाहनतळासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडुन वीजेचा पुरवठा तसेच पाण्याचा पुरवठा निविदा धारकाला स्वखर्चाने सुरू करुन घ्यावा लागेल व त्याची मासिक / वार्षिक देयके यशस्वी निविदाधारकाने स्वखर्चाने अदा करावयाची आहे.

७. सामाईक वापराच्या जागा वगैरेची स्वच्छता, देखभाल दुरुस्ती इ. बाबींची जबाबदारी त्या निविदाधारकाची राहील.

८. भाडेपट्टयाच्या कालावधीत निविदाधारकाचा दुर्देवाने मृत्यू झाला तर सुधारित भाडेपट्टा कायदेशीर वारसाबरोबर उर्वरित कालावधीसाठी करण्यात येईल. कायदेशीर वारसांची वाहनतळ चालविणेची इच्छा नसल्यास भाडेपट्टा रद्द करुन देय रक्कम परत करण्यात येतील.

९. यशस्वी निविदाधारकाने स्वत: वाहनतळ सुरू करुन संपूर्ण भाडे कालावधीत स्वत : तो चालविणे बंधनकारक आहे. इतर कोणासही पोटभाडयाने / कराराने किंवा अन्य कोणत्याही मार्गाने वाहनतळाचा पूर्ण किंवा काही भाग चालविण्यास अगर वापरण्यास देता येणार नाही

१०. वाहनतळावर निविदाधारकामार्फत जे कर्मचारी नेमण्यात येतील त्यांची संपूर्ण माहिती प्राधिकरणास देणे व त्यांचा पोलीस चौकशी अहवाल प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील. वाहनतळावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नांवे व फोटो तसेच वाहनांच्या प्रकारानुसार प्राधिकरणाने निश्चित करुन दिलेले दरपत्रक वाहनतळावर फलक लावून प्रदर्शित करणे आवश्यक आहे.

११. एकदा **भरलेली निविदा तीन वर्षांसाठी ग्राह्य असणार आहे.** यासाठी निविदाधारकास पहिल्या वर्षानंतर त्याचे कामकाज समाधानकारक असल्यास भाडेकरार नुतनीकरण करण्यास परवानगी घेवून नुतनीकरण (Leave & License) करावे लागेल. तसेच प्रतीवर्षी भाडेकराराच्या (Leave & License) रक्कमेत १२.५% वाढ करण्यात येईल. सदर रक्कम त्या त्या वर्षी भाडेकराराचे (Leave & License) नुतनीकरण करण्यापूर्वी प्राधिकरणाकडे जमा करावी लागेल. मात्र वाहनतळ भूखंडाचा विकास प्राधिकरणामार्फत विकसीत करावयाचा निर्णय झाल्यास, संबंधीतांना एक महिन्यांची मुदत देऊन त्यापुढील कालावधीसाठी भाडेकरार रद्द ठरवून भाडेतत्वावर दिलेला भूखंड काढून घेण्याचा अधिकार प्राधिकरणाला राहिल.

१२. मान्य निविदा धारकास वाहनतळाच्या जागेत कसलाही फेरफार, दुरुस्ती अगर वाढ, अगर कोणत्याही प्रकारचा बदल अथवा बांधकाम करता येणार नाही.

१३. ज्या नावाने निविदा मंजूर झाली आहे त्याच निविदाधारकाने भाडेकरार (Leave & License) नोंदविल्याचे तारखेपासून (ताबा मिळालेपासून) वाहनतळ सुरु करणे आवश्यक आहे आणि याबाबत कोणासही त्रास अथवा उपद्रव होईल अशारितीने व्यवसाय करता येणार नाही.

१४. या वाहनतळाच्या जागेची प्राधिकरणास आवश्यकता भासल्यास हा करार केव्हाही संपुष्ठात आणण्याचे प्राधिकरणास अधिकार राहील. त्यावेळी वापर केलेल्या कालावधीचे भाडेरक्कम आकारणी करुन उर्वरीत रक्कम परत केली जाईल.

१५. भविष्यात प्राधिकरणाने वाहनतळाच्या जागेत स्वच्छतागृहाचे बांधकाम करण्याचे ठरविल्यास स्वच्छतागृहासाठी लागणारी जागा वाहनतळाच्या जागेतून वापरण्यात येईल . मात्र त्यामुळे जागेचे भाडे कमी करण्यात येणार नाही.

१६. निविदाधारकाने करारनाम्यातील अटी शर्तीचा भंग केल्याने वाटप रद्द करण्यात आल्यास त्या विरोधात तसेच करारनाम्याची मुदत संपल्यानंतर मुदतवाढ मिळणेसाठी कोणत्याही न्यायालयात दाद न मागण्याचे हमीपत्र यशस्वी निविदाधारकाने सादर करणे आवश्यक राहील.

१७. भविष्यात वाहनतळाच्या जागेवर विकास कामे करण्याचे प्राधिकरणाने ठरविल्यास भाडेकरार (Leave & License) संपूष्टात आणण्याचा प्राधिकरणास अधिकार राहील. हे करताना ३० दिवसांची आगाऊ सुचना (नोटीस) देऊन प्राधिकरण आपला इरादा स्पष्ट करेल.

१८. यशस्वी निविदाधारकांस त्याने निविदा अर्जात नमुद केलेल्या निविदा रकमेनुसार प्रथम वार्षिक देय रक्कम त्वरीत भरणे बंधनकारक राहिल.

१९. **वाहनतळाच्या जागेचा वापर , मुळ हेतू व्यतीरिक्त अन्य प्रयोजनासाठी होत असल्यास किंवा त्याजागेचा गैरवापर होत असल्याचे आढळून आल्यास किंवा करारनाम्यातील अटी शर्तीचा भंग करुन ज्यादा दराने शुल्क वसूल केल्याचे निदर्शनास आल्यास, प्रथमतः लेखी समज देवून मासिक निविदा रकमेच्या ५०% इतका दंड आकारण्यात येईल, दुसऱ्यांदा भंग केल्यास पुन्हा लेखी समज देवून मासिक निविदा रकमेच्या १००% इतका दंड आकारण्यात येईल व त्यानंतर सुध्दा करारनाम्यातील अटी शर्तीचा भंग केल्यास अनामत रक्कम जप्त करुन, निविदा रद्द करुन संबंधित निविदाधारकाचे नाव काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल.**

२०. सरकारी, निमसरकारी, शासकिय वाहन या शासकिय मालमत्तेच्या वाहनांकडून तसेच ज्या वाहनांवर प्राधिकरणाचे अधिकृत नाव आहे, अशा वाहनांकडून वाहनतळ शुल्क

आकारण्यात येऊ नये मात्र शासकिय संस्थेने भाडेतत्वावर घेतलेल्या वाहनांकडून नियमानुसार वाहनतळ शुल्क आकारण्यात यावे.

२३. शासकिय आदेश, नैसर्गीक आपत्ती, दंगल अथवा अन्य काही अपरिहार्य कारणांमुळे वाहनतळ बंद राहिल्यास अगर बंद ठेवण्याचे आदेश दिल्यास व असा कालावधी ८ दिवसांपेक्षा अधिक असल्यास व निविदाधारकाने मागणी केल्यास त्याला निविदा रकमेतून सवलत किंवा नुकसान भरपाई देण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा राहिल.

२४. वाहनतळाचा वापर करणाऱ्या वाहनचालकांची वाहनतळाबाबत कोणतीही तक्रार असल्यास त्याची माहिती प्राधिकरण कार्यालयात उपमुख्य कार्यकारी अधिकारी, भूविभाग यांचेकडे देणेत यावी अशी माहिती देणारा फलक वाहनतळाचे दर्शनी भागात आणि सुस्पष्ट अक्षरात लावणे निविदाधारकावर बंधनकारक आहे.

२५. यशस्वी निविदाधारकास वाहनतळ शुल्क वसूलीकामी द्यावयाच्या पावतीचा नमुना प्राधिकरणामार्फत देणेत येईल. त्याच नमुन्यानुसार संबंधित निविदाधारकाने वाहनधारकास पावती देणे बंधनकारक आहे.

२६. माहिती पुस्तिकेत नमुद केलेप्रमाणे वाहनतळावर सुचना फलक न लावल्यास त्याकरीता प्रतिमहा रक्कम रु. ५००/- दंड आकारला जाईल.

२७. वाहनतळावरुन एखादे वाहन हरविल्यास/बदलल्यास/चोरीला गेल्यास अगर त्याची मोडतोड झाल्यास त्याबाबत पोलिसांकडे तक्रार करणे, विमा कंपनीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांबाबतची पूर्तता करणे संबंधित वाहनचालकावर बंधनकारक राहिल.

२८. या माहितीपत्रकात समाविष्ट नसलेल्या परंतू इतर आवश्यक बाबींसाठी शासनमान्य "डिस्पोजल ऑफ लँडस् रेग्युलेशन, १९७३" मधील तरतूदी लागू आणि ग्राहय राहतील.

२९. या माहितीपत्रकातील नियम किंवा अटी यांचे अर्थबोधाबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा राहील व तो निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

17/2/98

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण**
**निगडी, पुणे - ४११ ०४४.**

## परिशिष्ट "अ"

## वाटपासाठी उपलब्ध भूखंड व अनुषंगिक माहिती

| पेठ क्र | वाहनतळ क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. | १ वर्षासाठीचे एकूण किमान भाडे रु. | बयाणा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| ०४ | ०१ | ९७४.२ | ४,००,०००/- | (बयाणा रक्कम रु.६,५००/-) बयाणा रक्कम e-payment gateway mode द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे जमा करावी. |
| ०७ | ०१ | ४३८८.५ | २९,५०,०००/- | (बयाणा रक्कम रु.६५,०००/-) बयाणा रक्कम e-payment gateway mode द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे जमा करावी. |
| १८ | ०१ | ११८६.९ * | ४,५०,०००/- | (बयाणा रक्कम रु.६,५००/-) बयाणा रक्कम e-payment gateway mode द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे जमा करावी. |
| २० | ०१ | ११४७.७ | ४,५०,०००/- | (बयाणा रक्कम रु.६,५००/-) बयाणा रक्कम e-payment gateway mode द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे जमा करावी. |
| २५ | ०१ | १८३९.४ | ८,५०,०००/- | (बयाणा रक्कम रु.१३,०००/-) बयाणा रक्कम e-payment gateway mode द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे जमा करावी. |
| सी.डी.सी | ०१ | २१२३.६ | ९,००,०००/- | (बयाणा रक्कम रु.१३,०००/-) बयाणा रक्कम e-payment gateway mode द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे जमा करावी. |

* प्रत्यक्ष मोजणीनंतर नियोजन शाखेकडुन भूखंडाचे अंतिम सिमांकन प्रमाणपत्र येणेवर.

# परिशिष्ट - २

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
आकुर्डी, पुणे - ४११ ०४४.

विषय :- पेठ क्र.        मधील वाहनतळ क्र. ०१ प्राधिकरणाने बांधलेला वाहनतळ भूखंड भाडेकराराने देणेबाबत निविदा अर्ज.

संदर्भ:- ई-निविदा क्र. ____________________________
(निविदा क्रमांक नमुद करणे.)

वरील ई-निविदा कागदपत्रांसह डाऊनलोड करणेत येत आहेत आणि विषयाचे जाहिरातीचे अनुषंगाने तांत्रिक लिफाफा (लिफाफा क्र. १) खालील प्रमाणे आहे.

१. Online फॉर्म फी जमा केल्याची बँक / Online पावती रु. ५००/- (सदरची रक्कम परत केली जाणार नाही)
२. Online बयाना रक्कम जमा केल्याची बँक /Online पावती रुपये --------/-
३. निविदाधारक संस्था असल्यास नुतनीकरणासह अद्ययावत नोंदणी प्रमाणपत्र.
४. कंपनी/संस्था आस्थापनाच्या बाबतीत अर्जावर सही करण्याबाबचे अधिकारपत्र.
५. संस्थेचे/व्यक्तीचे मागील ३ वषाचे (वित्तीय वर्ष २०१४-१५,१५-१६,१६-१७) आयकर रिटर्न प्रमाणपत्र
६. महाराष्ट्राचा रहिवास असल्याचा अधिवासाचा दाखला / जन्म स्थळाच्या अभिलेखासह शाळा सोडल्याचा दाखला . विवाहित स्त्री बाबत निवास दाखला, जन्म स्थळाच्या उल्लेखासह शाळा सोडल्याचा दाखला किंवा विवाह प्रमाणपत्र

   किंवा

   पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात अर्ज दिनांकापूर्वी सलग १ वर्षे कोणत्याही नोंदणीकृत कंपनी/संस्था/ शासकीय निमशासकिय आस्थापनेमध्ये नोकरीस असल्याचा दाखला
७. सहकारी संस्था , सार्वजनिक / निमसार्वजनिक प्राधिकरणे/ सार्वजनिक किंवा खाजगी कंपन्या / भागिदारी संस्था यांना भूवाटप नियमानुसार महाराष्ट्रातील नोंदणीप्रमाणपत्र.
८. भागिदार करारनामा/ मेमोरंडम ऑफ असोसिएशन / आर्टिकल ऑफ असोसिएशन प्रत/ ट्रस्टडीड/ घटनाप्रत.
९. प्रस्तुत योजनेतील भूखंड वाहनतळासाठी आरक्षित असलेने त्याचा वापर केवळ वाहनतळाचे प्रयोजनार्थ करावा लागेल याची मला / आम्हाला माहिती आहे.

सही : ____________________

संपूर्ण नाव : ____________________

संपूर्ण पत्ता : ____________________
____________________

मोबाईल क्रमांक : ____________________

**टिप: तांत्रिक लिफाफा (लिफाफा क्र. १) मध्ये वरील कागदपत्रे स्वाक्षरी करुन** Online Submit **करणे आहे.**

# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे ४४.

## वाहनतळ भूखंड भाडेकराराने देणेसाठी निविदा अर्ज

## (आर्थिक लिफाफा क्र. २)

## परिशिष्ट - ३

दिनांक :-

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
आकुर्डी, पुणे - ४११ ०४४.

**विषय** :- पेठ क्र. मधील वाहनतळ क्र. ०१ प्राधिकरणाने बांधलेले वाहनतळ भूखंड भाडेकराराने देणेबाबत निविदा अर्ज.

**संदर्भ** :- दै. _______________मधील जाहिरात दि. _____________ ई- निविदा क्र. _____

१. मी / आम्ही वरील विषयाचे जाहिरातीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे तीन वर्षासाठी निविदा भरत आहे/ आहोत.

२. मी / आम्ही सदर जागेच्या माहिती पत्रकातील सर्व नियम व अटी वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत व त्या माझे / आमच्यावर बंधकारक आहेत.

३. मी / आम्ही खाली नमुद केल्याप्रमाणे पेठ क्र. मधील वाहनतळ क्र. ०१ वापराचे प्रयोजनासाठी माझी/ आमची जास्त दराची निविदा सादर करीत आहे / आहोत.

| पेठ क्र. | वाहनतळ क्र. | १ वर्षासाठीचे एकूण किमान भाडे रु. | वार्षिक किती परवाना फी देण्यास तयार आहे. |
|---|---|---|---|
| | | | अंकात रुपये :<br>अक्षरी रुपये : |

४. शासनाच्या धोरणानुसार निविदाधारकाने निविदा मंजूर झाल्यानंतर खरेदी किंमती व्यतिरिक्त प्रचलित जीएसटी तसेच तत्सम कर, शुल्क भरणा करणे अनिवार्य आहे , याची मला जाणीव आहे.तसेच 'आयकर' संदर्भातील तरतूदीची (माहिती पत्रकानुसार) मला जाणीव आहे.

५. मी / आम्ही माहिती पत्रकातील पात्रतेच्या अटीनुसार अर्ज भरण्यास पात्र असून माझ्या / आमच्या पात्रतेबाबतच्या पुराव्याची कागदपत्रे (निवासाचे दाखले/ शाळा सोडल्याचे दाखले , नोंदणी प्रमाणपत्र व अन्य कागदपत्रे) लिफाफा क्र. १ मध्ये सादर केली आहे.

६. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी पेठ क्र. मधील वाहनतळ क्र. ०१ च्या प्रयोजनार्थ निविदा पध्दतीने भाडेतत्वावर निविदेच्या मागविलेल्या ई- निविदेतील सर्व अटी व शर्ती मला/ आम्हाला मान्य आहे.

७. सदर भूखंडासाठी माझी निविदा मंजुर झाल्यास सदर जागेसाठी प्रथमत: १ वर्षासाठी व त्यानंतर २ वर्षासाठी भाडे करारनामा (Leave & License) करण्यापूर्वी, सुरक्षा अनामत रक्कम म्हणून एक वर्षासाठी निश्चित केलेल्या भाडया च्या पूर्ण रक्कमेएवढी रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेच्या बँक गॅरेंटीच्या स्वरुपात प्राधिकरणाकडे भरण्याचे मी मान्य करित आहे.

८. त्यानुसार मी/ आम्ही निविदा बयाना रक्कम रु. ----------------/- चा भरणा ऑनलाईन केला आहे.

सही :
_______________

संपूर्ण नाव : _______________

संपूर्ण पत्ता : _______________

दूरध्वनी क्रमांक : _______________

सॉ १

# पिंपरी - चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

प्लॉटचा नकाशा व ताबेपावती

| पेठ क्रमांक | प्लॉट क्रमांक | क्षेत्र चौ.मीटर | प्लॉट धारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ०४ | वाहनतळ व हॉकर | ६७४.२ | |

कृपया नकाशा मागे पहा

O/C

प्र. मुख्य रचनाकार

२६/२/९३
कॅ. सर्व्हेअर

२६/२/९३
हेड सर्व्हेअर

प्रमाण १ : ५००

आज दिनांक रोजी वरील आकृतीतील नमुद केलेल्या प्लॉटच्या चतु : सिमांची मापे जागेवर प्रत्यक्ष तपासून
ताबा दिला. ताबा मिळाला.

प्रतिनिधि
पिंपरी -चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

प्लॉट धारक




S = 80.85

Δ1 = ७+८३.७०+७५.०

= 80.85 × 4.15 × 2.85

= 289.83

S = 92.30

Δ2 = ७५ + १६.६० + ८३.०

7.3 × 75.7 × 9.3

688.73

Δ1 + Δ2 = 978.56

वजा जाते 4.34

= 974.22

टिप :

— याप्रमाणे भूखंड हद्द असे.




प्रमाण 1 : 500

स/3 (7)

# पिंपरी - चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

प्लॉटचा नकाशा व ताबेपावती

| पेठ क्रमांक | प्लॉट क्रमांक | क्षेत्र चौ.मीटर | प्लॉट धारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ७ | वाहनतळ | ४३८८.५ | |

कृपया नकाशा मागे पहा

मुख्य रचनाकार

O/C

क. सर्व्हेअर २८/२/९३

हेड सर्व्हेअर २८/२/९३

प्रमाण १ : ५००

आज दिनांक रोजी वरील आकृतीतील नमुद केलेल्या प्लॉटच्या चतु : सिमांची मापे जागेवर प्रत्यक्ष तपासून
ताबा दिला. ताबा मिळाला.

प्रतिनिधि
पिंपरी -चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

प्लॉट धारक




नोंद :

— याप्रमाणे भूखंड हद्द असे.

▨ याप्रमाणे बांधकाम असे

(२०) ..सौ/७

# पिंपरी - चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

प्लॉटचा नकाशा व ताबेपावती

| पेठ क्रमांक | प्लॉट क्रमांक | क्षेत्र चौ.मीटर | प्लॉट धा..काचे नाव |
|---|---|---|---|
| 20 | वाहनतळ जागा क्र. १ | ११६७.७ | |




टिप :

⊠ या प्रमाणे ट्रान्सफार्मर असे




**मुख्य रचनाकार**

कॅ. सर्व्हेअर — हेड सर्व्हेअर — प्रमाण १ : ५००

आज दिनांक ... रोजी ...

# पिंपरी – चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

प्लॉटचा नकाशा व ताबेपावती

| पेठ क्रमांक | प्लॉट क्रमांक | क्षेत्र चौ.मीटर | प्लॉट धारकाचे नाव |
|---|---|---|---|
| २५ | वाहनतळ जागा क्र.१ | १८३९.४ | |




मुख्य रचनाकार

क. सर्व्हेअर

हेड सर्व्हेअर

प्रमाण १ : ५००

आज दिनांक रोजी वरील आकृतीतील नमूद केलेल्या प्लॉटच्या चतु:सिमांनी ...

# पिंपरी – चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

प्लॉटचा नकाशा व ताबेपावती

| पेठ क्रमांक | प्लॉट क्रमांक | क्षेत्र चौ.मीटर | प्लॉट धारकाचे नाव |
|---|---|---|---|
| [illegible] | [illegible] | 2323.6 [illegible] | |




कॅ. सर्व्हेअर — हेड सर्व्हेअर — प्रमाण १ : ५००

२६


PIMPRI CHINCHWAD NEW TOWN
LAYOUT PLAN OF SECTOR NO.7
ELECTRONIC INDUSTRIAL AND
RESIDENTIAL ZONE AT BHOSARI.
1490
REFERENCES
EXISTING
PROPOSAL
LAND USE ANALYSIS
DETAILS OF PLOTS
PIMPRI CHINCHWAD NEW TOWN
DEVEL OPMENT AUTHORITY
APPROVED D.A.MEETING
LOCATION PLAN
DISTRICT CENTRE
SECTOR NO.10
SECTOR NO.3
SECTOR NO.2
SECTOR NO.1
M.I.D.C. AREA
FACILITY CENTRE
PRIMARY SCHOOL
OPEN SPACE
RESERVE
24.00 M WIDE ROAD
वाहनतळ


PIMPRI CHINCHWAD NEW TOWN
REVISED LAYOUT PLAN OF SECTOR NO.20
LEGEND
EXISTING
PROPOSALS
LAND USE ANALYSIS
LOCATION PLAN
PIMPRI CHINCHWAD NEW TOWN DEVELOPMENT AUTHORITY
SECTOR NO.19
SECTOR NO 18
SECTOR NO 21
M.I.D.C.
M.I.D.C. WATER TANK
P.C.M.C. TANK
30.00 M.WIDE H.C.M.T.R.
वाकनलळ




LAND USE ANALYSIS

| | HA | % |
|---|---|---|
| RESIDENTIAL | 21.85 | 50.10 |
| COMMERCIAL | 3.17 | 7.26 |
| PUBLIC & SEMIPUBLIC | 3.82 | 8.75 |
| RECREATION GROUNDS | 5.06 | 11.59 |
| ROADS PATHWAYS & PARKING | 9.73 | 22.30 |
| TOTAL SECTOR AREA(EXCLUDING SPINE ROAD) | 43.63 | 100% |
| AREA UNDER SPINE ROAD | 127 | |
| GRAND TOTAL | 44.90 | |

PLAN APPROVED BY GOVERNMENT OF MAHARASHTRA URBAN DEVELOPMENT AND PUBLIC HEALTH DEPARTMENT BOMBAY
UNDER LATTER NO T.P.S 1970/775/UD/9/DATED 9/9/77


PIMPRI CHINCHWAD NEW TOWN
DISTRICT CENTRE AT VILLAGE CHIKHALI
1469
वाहनतळ
SECTOR NO 17
SECTOR NO 13
LOCATION PLAN
M.I.D.C. AREA
PIMPRI CHINCHWAD NEW TOWN
DEVELOPMENT AUTHORITY

२९.


PIMPRI CHINCHWAD NEW TOWN
1486
PROPOSED LAYOUT PLAN OF SECTOR NO.4
AT VILLAGE
LEGEND
LOCATION PLAN
DISTRICT CENTRE
SECTOR NO. 5
SECTOR NO. 3
24.0M.WIDE ROAD
15.0M.WIDE ROAD
45.M.WIDE SPINE ROAD
OPEN SPACE NO. 2
SEPTIC TANK
PRIMARY SCHOOL
BULK LAND 4.00
LAND OF NARAYAN HUT
FROM PUNE
PIMPRI CHINCHWAD NEW TOWN
DEVELOPMENT AUTHORITY
CHIEF EXECUTIVE OFFICER
वाहनतळ